## ॥ प्रेसनोट ॥

महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ च्या कलम ३३ (१) नुसार वैद्यकीय व्यसायिकांना संबंधित वैद्यकीय परिषदेकडे नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यानुसार १) महाराष्ट्र वैद्यक परिषद, २) महाराष्ट्र समचिकीत्सा परिषद, ३) महाराष्ट्र भारतीय चिकीत्सा परिषद, ४) महाराष्ट्र दंतवैद्य परिषद या चार वैधानिक परिषदांकडे राज्यात/जिल्ह्यात कार्यरत असणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांनी नोंदणीकरण करणे आवश्यक आहे. नोंदणीकृत वैद्यक व्यवसायिकांव्यतीरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस राज्यामध्ये वैद्यकीय व्यवसाय करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत मा. आयुक्त यांच्या आदेशाने बोगस व्यवसायिकांचा शोध घेणे व प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश वैद्यकीय अधिकारी, नागरी आरोग्य केंद्र (सर्व) यांना देण्यात आले आहेत. त्यांच्यामार्फत कार्यक्षेत्रातील रुग्णालय व क्लिनिक ला भेट देऊन बोगस डॉक्टर्स शोधण्यासाठी वैद्यकीय व्यवसायिकांची अर्हता तपासणी करण्याचे काम निरंतर चालू आहे.

बोगस व्यवसायिकांचा शोध मोहिमेंतर्गत नागरी आरोग्य केंद्र, मिरारोड येथील वैद्यकीय अधिकारी यांनी हैदरी रुग्णालय येथे तपासणी दरम्यान डॉ. तारिक खान, ड्युटी वैद्यकीय अधिकारी यांचे कागदपत्र तपासले असता ते कर्नाटक आयुर्वेदिक आणि युनानी प्रॅक्टीशनर बोर्डचे होते. परंतु त्यांच्याकडे महाराष्ट्र भारतीय चिकीत्सा परिषदचे नोंदणी प्रमाणपत्र नसल्याचे निर्दशनास आले होते.

सदर डॉक्टर महाराष्ट्र भारतीय चिकीत्सा परिषदेकडे नोंदणीकृत आहेत का ? याबाबत पत्राव्दारे महाराष्ट्र भारतीय चिकीत्सा परिषदेकडे विचारणा केली असता सदर डॉक्टर नोंदणीकृत नसल्याचे परिषदेतर्फे कळविण्यात आले.

सबब, डॉ. तारिक खान यांच्याकडे महाराष्ट्र भारतीय चिकीत्सा परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र नसताना बेकायदेशीररीत्या वैद्यकीय व्यवसाय करत असल्यामुळे त्यांच्यावर नागरी आरोग्य केंद्र, मिरारोड येथील वैद्यकीय अधिकारी यांच्या तक्रारीवरुन नयानगर पोलिस स्टेशन येथे दि.०१/०२/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच सदर मोहीम यापुढेही अशीच चालू ठेऊन उपरोक्त नमूद वैद्यकीय परिषदेकडे नोंदणी केल्याशिवाय कोणीही व्यक्ती मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वैद्यकीय व्यवसाय करत असल्याचे निर्दशनास आल्यास सदर व्यक्ती विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येईल.

**(डॉ. संभाजी पानपट्टे)**
**अतिरिक्त आयुक्त (सार्व.आ.वि.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**